झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र.
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/ १४२१/२०२४
दिनांक : १० / ०९/२०२४

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

## झोपडपट्टी निर्मुलन आदेश

(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(ड) सह १२ अंतर्गत आदेश)

<u>प्रस्तावना</u>

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरीता "उपरोक्त अधिनियम" असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे. आणि,

१) ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजूरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. आणि,

२) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये सि.स.नं.९६३अ, फा.प्लॉ.नं.३९१अ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे २६८३.०५ चौ.मी. या क्षेत्रावर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे ) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. सुयश व्हेंचर्स यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे.

३) ज्याअर्थी, सदर क्षेत्र दि.१३/०९/२०२२ रोजीच्या आदेशाद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २५ ते ३१, २०१८ रोजीच्या राजपत्रात पान क्र. २० व २१ वर आणि स्थानिक वृत्तपत्रात दि.११/१०/२०१८ रोजी प्रसिध्द करणेत आलेला आहे तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रकारे योजनाक्षेत्रात दि.१२/१०/२०१८ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. आणि,

४) ज्याअर्थी, सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०२२ यातील नियम क्र. १४.६.१२ (१) च्या तरतुदीनुसार दि.१६/०८/२०२४ रोजी प्रशाराकीय मान्यता देण्यात आली. आणि,

५) ज्याअर्थी, सदर मिळकतीवरील झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२, झोपुप्रा, पुणे यांचेमार्फत दि.०७/०३/२०१९ रोजी तयार करणेत आलेली आहे. सदर मिळकतीवरील अंतिम पात्रता यादीनुसार एकूण झोपड्यांची संख्या १६० असून त्यामध्ये ५७ पात्र, १०३ अपात्र असा समावेश असल्याचे दिसून येते. आणि,

(६) ज्याअर्थी, उक्त झोपडपट्टी पुनर्वसन आदेशास मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती/झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३(ड) अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे. आणि,

(७) ज्याअर्थी, विकसक मे. सुयश व्हेंचर्स यांचेमार्फत पात्र झोपडीधारकांचे तात्पुरते भाडे तत्वावर स्थलांतरण करणेबाबतची जबाबदारी विकसक या नात्याने व झोपुप्रा कार्यालयाचे नियमानुसार ठरवून दिलेल्या दरमहा भाडे द्यायला तयार असलेबाबतचे दि.२८/०८/२०२४ रोजीचे हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे. संक्रमणासाठी पात्र झोपडीधारकास प्रति महा रु.६१४४.५/- इतके भाडे निर्धारित केले असून प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र.१० दि.१२/१२/२०२३ नुसार झोपडपट्टी निष्कासनापूर्वी संबंधित विकसकाने अशा झोपडीधारकास १ वर्षाचे भाडे आगाऊ स्वरुपात द्यावे व त्यानंतरच्या कालावधीसाठी प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीस १ वर्षाचे आगाऊ भाडे सर्व पात्र झोपडीधारकांना विकसकाने अदा करणे अनिवार्य आहे.

८) झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व विकास नियंत्रण नियमावलीतील सर्व तरतुदींची पुर्तता करण्याच्या अधीन राहून योजनेअंतर्गत पुढील कामकाज पार पडणे आवश्यक असल्याचे माझी खात्री झाल्याने व अधिनियमांतर्गत कार्यवाही करण्यास सक्षम असल्याने मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३ड सह कलम १२(१) नुसार खालीलप्रमाणे झोपडपट्टी निर्मुलन आदेश पारित करत आहे.

आदेश :-

१) खालील अनुसुचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषीत करत आहे.

२) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकाम या मधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसकाच्या ताब्यात द्यावी.

३) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन मोकळी करावी व संक्रमण व्यवस्थेसंदर्भातील अन्य निवासी व्यवस्थेचा विकल्प निवडून तात्काळ स्थलांतरित व्हावे.

४) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीतील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिका-यास राहतील.

५) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

६) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

७) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत मा.शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचे कार्यालयात अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

झोपडपट्टीचे नाव : . सि.स.नं.९६३अ, फा.प्लॉ.नं.३९१अ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे

महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका

अनुसूची

| गाव- भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं./ फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| सि.स.नं.९६३अ, फा.प्लॉ.नं.३९१अ, भांबुर्डा, शिवाजीनगर , पुणे | खाजगी | २६८३.०५ चौ.मी. | लागू सि.स.नं.३८८, ३८२, ३८३ | लागू रस्ता | लागू सि.स.नं. ३९२ | लागू रस्ता |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

दिनांक :- १० /०८ /२०२४

(नीलेश र. गटणे), (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

प्रत-

१. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका पुणे- यांना माहितीस्तव सादर.
२. विकसक मे. सुयश व्हेंचर्स, १२०७/बी, अस्मिता हौसिंग सोसायटी, आपटे रोड, पुणे - यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.